# पावसाळ्यातील खोळंबा टाळण्यासाठी मध्य रेल्वेची तयारी

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई:** पावसाळ्यात रेल्वे रुळांवर पाणी भरण्याच्या घटना रोखण्यासाठी मध्य रेल्वेची भिस्त पंपावरच असणार आहे. पावसाच्या पाण्याचा वेगाने उपसा करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने २१० पंप कार्यान्वित केले आहेत. कसारा आणि लोणावळा घाटमार्गावर कोसळणाऱ्या दरडींपासून बचावासाठी जाळी आणि गॅबियन वॉल अशा उपाययोजनांना बळकटी देण्यात आली आहे.

मान्सून लक्षात घेता मध्य रेल्वेने उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार पावसाळ्यात लोकलसह मेल-एक्स्प्रेस चालवण्यासाठी जलनिस्सारण यंत्रणेचे बळकटीकरण, संवेदनशील ठिकाणांसह घाटमार्गावर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मुसळधार पावसात पाणी भरणारी ११७ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. साचणाऱ्या पाण्याचा वेगाने उपसा करण्यासाठी १२.५ अश्वशक्ती ते १०० अश्वशक्तीचे एकूण २१० हेवी ड्युटी पंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पाण्याचा निचरा होणाऱ्या गटारे, कल्व्हर्ट आणि पुलांखालील जलमार्गांची स्वच्छता करण्यात आली आहे.

उपनगरी रेल्वे मार्गावरील १८ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. शीव-कुर्ला, चुनाभट्टी-कुर्ला, विक्रोळी-कांजूरमार्ग, कुर्ला-टिळकनगर दरम्यान कायमस्वरूपी उपाययोजनांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ठिकाणी मायक्रो टनलिंग, रुळांची उंची वाढवणे, पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गांमध्ये सुधारणा करणे अशी दीर्घकालीन कामे २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. नुकतेच ठाणे स्थानकात ११० मीटर लांबीचे मायक्रोटनलिंगचे काम पूर्ण झाल्याने ठाण्यातील पाणी भरण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे.

कसारा आणि लोणावळ घाटमार्गावर



केलेल्या कामांमुळे २०२४-२५ आणि २०२५-२६मध्ये घाटमार्गावर दरड कोसळून रेल्वे वाहतूक बंद झाल्याची घटना घडली नाही. यंदाही कोकण रेल्वेच्या मदतीने आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. यात दगडरोधक जाळी बसवणे, कुंपण घालणे, बोगद्यांची प्रवेशद्वारे, गॅबियन संरचना उभारणे, संरक्षक भिंतीचे बळकटीकरण अशा उपाययोजनांचा समावेश आहे.

रेल्वेच्या समस्यांसंदर्भात वाचकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. तसेच रेल्वे प्रशासनाने सुधारणा करण्याची अपेक्षा व्यक्त केली. लोकल गाड्या वेळेवर धावत नसल्यामागे गर्दीच्या वेळेत मेल व एक्स्प्रेस गाड्यांना प्राधान्य दिले जाणे हे एक प्रमुख कारण आहे. विशेषतः मध्य रेल्वेवर याचा अधिक परिणाम जाणवतो. त्यातच नव्याने सुरू झालेल्या वातानुकूलित लोकलमुळे प्रवाशांचा गोंधळ वाढला आहे. एसी लोकलचे तिकीट काढल्यानंतर अनेकदा ती गाडी वेळेवर मिळत नाही. परिणामी, साध्या गाडीतून प्रवास करावा लागतो आणि प्रवाशांचे पैसे वाया जातात. स्वतंत्र एसी लोकल चालविण्याऐवजी प्रत्येक गाडीला किमान दोन वातानुकूलित डबे जोडण्याचा पर्याय तपासून पाहावा. त्यामुळे अधिक प्रवाशांना या सुविधेचा लाभ मिळेल, फलाटावरील गर्दी कमी होईल आणि गाड्यांचे वेळापत्रकही कमी प्रमाणात विस्कळीत होईल. कांदिवलीच्या ठाकूर व्हिलेजमध्ये राहणारे ज्येष्ठ नागरिक म्हणाले, कामानिमित्त मला नियमित मेट्रोने अंधेरीपर्यंत प्रवास करावा लागतो. मात्र, मेट्रोतील आरक्षित आसनांच्या वापराबाबत गंभीर समस्या जाणवत आहे. अनेकदा तरुण प्रवासी, विशेषतः पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी राखीव असलेल्या आसनांवर बसतात. विनंती करूनही ते जागा देण्यास नकार देतात. वाढत्या असहिष्णुतेच्या पार्श्वभूमीवर वाद घालणे धोकादायक वाटते. त्यामुळे पाठदुखी आणि पायांच्या त्रासामुळे उभे राहून प्रवास करावा लागतो. विदेशातील अनेक शहरांमध्ये, विशेषतः लंडनच्या भूमिगत रेल्वेमध्ये, सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियमित गस्त असते. आपल्या लोकल आणि मेट्रो सेवांमध्येही सशस्त्र सुरक्षा दलाची नियुक्ती करून प्रवाशांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे आवश्यक आहे.

रेल्वे पोलिसांनी स्थानके आणि गाड्यांमध्ये गस्त वाढवावी, महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथके नियुक्त करावीत आणि तक्रारींवर त्वरित कारवाई करावी. रेल्वे प्रशासनाने गर्दी कमी करण्यासाठी अधिक फेऱ्या चालवाव्यात, स्थानकांवरील सुविधा सुधाराव्यात, तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी नियमित देखभाल करावी आणि प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. लोकप्रतिनिधी, मंत्री आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी या सर्वांचा पाठपुरावा करावा. त्यासाठी स्वतः अचानक लोकलमधून प्रवास करावा व खरी परिस्थिती जाणून घ्यावी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सर्व लोकल वेळेवर चालवणे आवश्यक आहे. एसी लोकल रद्द करून साध्या लोकलमध्ये तीन एसी डबे बसवल्यास निम्म्या समस्या कमी होतील. रेल्वे प्रशासन आणि राज्य सरकारने सर्वांत आधी बिघडलेल्या कायदा सुव्यवस्थेत सुधारणा करणे गरजेचे आहे. पोलिस भरती तातडीने करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक फलाटावर वस्तूंची तपासणी करण्यासाठी स्कॅनरची गरज आहे.

मेट्रो स्थानकावर सर्व तपासण्या होतात. मग रेल्वे स्थानकांवर तसे का होत नाही? तसेच, महिला डब्यात एक महिला पोलिस कर्मचारी तैनात करणे आवश्यक आहे. पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेनमध्ये प्रथम श्रेणी डब्यामध्ये विनातिकीट किंवा द्वितीय श्रेणीचे प्रवासी घुसखोरी करत आहेत. त्यामुळे नियमानुसार जास्त पैसे देऊन प्रथम श्रेणीचे तिकीट किंवा पास काढणाऱ्या प्रवाशांना नाहक मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते.

# मुंबईसह कोकणात दमदार पाऊस

### ♦ जुलैमधील पावसामुळे दिलासा मिळणार?



प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** प्रादेशिक हवामान विभागाने मंगळवारसाठी अद्ययावत इशारा जारी केला. त्यावेळी मुंबईसाठी ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला. ठाणे, रायगड, रत्नागिरीसाठीही ऑरेंज ?लर्ट देण्यात आला तर पालघर जिल्ह्यासाठी रेड देण्यात आला. त्यानंतर दिवसभरात महामुंबईत परिसरात किरकोळ पावसाची नोंद झाली. १ जुलैपासून मुंबई, ठाणे जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढेल तशीच मुसळधार पावसाची व्याप्तीही वाढेल अशी शक्यता आहे. १ जुलै रोजी पालघर आणि सिंधुदुर्ग वगळता इतर जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडू शकेल. पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसासाठी यलो ?लर्ट देण्यात आला आहे. २ जुलैला याची व्याप्ती वाढून संपूर्ण कोकण विभागात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकण विभागातील पावसाचा जोर घाट परिसरातही दिसेल. पुणे, कोल्हापूर आणि सातारा घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार तसेच अति मुसळधार पाऊस २ जुलैपर्यंत अपेक्षित आहे.

मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांना आज, मंगळवारी यलो अॅलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये मात्र ऑरेंज देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

पुण्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

शहरात सोमवारी दिवसभर आकाश ढगाळ होते आणि दुपारनंतर काही भागात पावसाच्या सरींनी हजेरी लावली. घाट माथ्यावर मध्य स्वरूपाचा पाऊस पडला. ताम्हिणीमध्ये २४ तासांत १२५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. दरम्यान, पुढील दोन दिवस आकाश मुख्यतः ढगाळ राहणार असून, संध्याकाळी मेघगर्जनेसह हलक्या सरी पडणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे. अनुकूल घडामोडींमुळे गेल्या आठवड्यात शहरात पाऊस पडला. मात्र, दोन दिवसांत पावसाचा जोर ओसरला आहे. सोमवारी सकाळपासून आकाशात ढग दाटून आले होते, उकाडाही वाढला होता. त्यामुळे दुपारीच पावसाला सुरुवात होईल अशी पुणेकरांची अपेक्षा होती; पण संध्याकाळी काही भागात वारा सुटला आणि हलक्या सरी पडल्या. त्यामुळे उकाडाही कमी झाला होता. जिल्ह्यातही हलक्या स्वरूपाचा, तर घाटात मोजक्या ठिकाणी जोराचा पाऊस पडला. पुढील दोन दिवस घाटात मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# मुंबईत भूमिगत लोकलच्या दिशेने पाऊल व्यवहार्यतेचा अभ्यास होणार, स्थान सर्वेक्षणास मंजुरी

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** चर्चगेट-प्रभादेवी मार्गावर उपनगरीय लोकलसाठी स्वतंत्र भूमिगत रेल्वे बोगदा बांधण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. त्यानुसार या प्रस्तावाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी रेल्वे बोर्डाने अंतिम स्थान सर्वेक्षण (फायनल लोकेशन सर्व्हे - एफएलएस) करण्यास मंजुरी दिली असून, लवकरच त्याला सुरुवात होणार आहे. बोगद्यामुळे उपनगरीय आणि लांब पल्ल्याच्या रेल्वे वाहतुकीचे विभाजन करून विद्यमान मार्गावरील ताण कमी करण्याचा रेल्वेचा प्रयत्न आहे.

मुंबई सेंट्रल ते चर्चगेटदरम्यान सध्या चार रेल्वे मार्गिका असून, त्यावर आणखी रेल्वे ट्रॅक उभारण्यासाठी जागेचा अभाव, भूसंपादनाचा वाढता खर्च, दाट नागरी वस्ती आणि कायदेशीर अडचणी हे मोठे अडथळे ठरत आहेत. त्यामुळे जमिनीवरील मार्गिकेऐवजी भूमिगत बोगद्याचा पर्याय रेल्वेकडून तपासला जात आहे. पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, अंतिम स्थान सर्वेक्षणाद्वारे बोगद्याची आवश्यकता, त्याचा संभाव्य मार्ग आणि तांत्रिक बाबींचा सविस्तर अभ्यास केला जाईल. त्यानंतरच या प्रकल्पाबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. अशा प्रकारचे भूमिगत रेल्वे प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक तांत्रिक क्षमता आता उपलब्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




**मार्गिकेचा फायदा काय होणार आहे ?**

सध्या पश्चिम रेल्वेकडून मुंबई सेंट्रल ते माहिमदरम्यान पाचवा आणि सहावा रेल्वे मार्ग उभारण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पामुळे उपनगरीय आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध होणार आहेत. मात्र, भूसंपादनातील अडचणींमुळे त्याचे लक्ष्य मार्च २०२९ पर्यंत ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर भूमिगत बोगद्याचा पर्यायही रेल्वेकडून समांतरपणे तपासला जात आहे. याच धर्तीवर मध्य रेल्वेवर परळ ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) दरम्यानही भूमिगत रेल्वे बोगद्याचा पर्याय अभ्यासाधीन आहे.

**वातानुकूलित उपनगरीय रेल्वे व्यवस्था उभारण्यास मदत**

मुंबईतील भूमिगत मेट्रो मार्गांचा खर्च प्रतिकिलोमीटर सुमारे १,१०० कोटी रुपये असून, तो उन्नत मार्गांच्या तुलनेत तीन ते चार पट अधिक आहे. मात्र, अशा प्रकल्पांमुळे भूसंपादन, अतिक्रमण आणि वाहतूक व्यवस्थापनातील अडचणी टाळता येतात. उपनगरीय लोकल, मालगाड्या आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध झाल्यास रेल्वेची वेळपालन क्षमता वाढण्यास आणि भविष्यात पूर्णपणे वातानुकूलित उपनगरीय रेल्वे व्यवस्था उभारण्यास मदत होणार आहे.

**विरार-डहाणू सेवेसाठी खूशखबर**

सध्या पश्चिम रेल्वे चर्चगेट-डहाणू (१२३ किमी) तसेच हार्बर मार्गावर गोरेगावपर्यंत दररोज सुमारे १,४१४ लोकल फेऱ्या चालवते. भविष्यात मुंबई सेंट्रल-बोरिवलीदरम्यान पाचवा-सहावा मार्ग, बोरिवली-विरारदरम्यान अतिरिक्त मार्ग आणि विरार-डहाणूदरम्यान तिसरा-चौथा मार्ग उभारण्याचीही योजना आहे.

## लग्नासाठी एसटी मिळणार सवलतीच्या दरात

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** शेतकरी कुटुंबांना लग्नसमारंभासाठी सवलतीच्या दरात एसटी बस उपलब्ध करून दिली जाईल. तसेच अवैध प्रवासी करणाऱ्या वाहनांचे परवाने रद्द करण्यात येईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सभागृहात केली. सरनाईक म्हणाले, शेतकरी कुटुंब लग्न किंवा अन्य शुभकार्यासाठी अनेकदा ट्रक, डंपर किंवा अन्य अवैध वाहनांचा वापर करतात. ही बाब लक्षात घेऊन महामंडळाकडे नवीन बसचा ताफा दाखल झाल्यानंतर शेतकरी कुटुंबात मुलगा किंवा मुलीचे लग्न असेल आणि त्यांनी एसटीकडे बसची मागणी केली, तर एसटी महामंडळ त्यांच्या दारापर्यंत बस पोहोचविण्यासाठी प्रयत्न करेल. राज्यात वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे, मेट्रो, एसटी आणि बेस्ट यांसारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवर ताण वाढला असून त्याचा फायदा अवैध प्रवासी वाहतूक करणारे घेतात.

# ऑरेंज गेट-मरिन ड्राइव्ह भुयारी मार्गावर 280 मीटर रस्ता तब्बल 13 मार्गिकांचा

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भुयारी मार्गासाठी मरीन ड्राइव्ह येथे जवाहर बालभवन भागात रस्त्याचा विस्तार करावा लागणार आहे. यासाठी दोन्ही बाजूंच्या वाहतुकीसाठी १३ मार्गिकांचा रस्ता उभारण्याच्या कामाला महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यानुसार आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या भागात सेवा वाहिन्या हलविण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यासाठी मरिन ड्राइव्हवर बॅरिकेडिंग करण्यात आले आहे.

ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भुयारी मार्गासाठी जवाहर बालभवन भागात



नेताजी सुभाषचंद्र मार्गावर एंट्री-एक्झिट रॅम्प उभारावे लागणार आहेत; त्यामुळे सध्याचा अस्तित्वातील रस्ता निमुळता होणार आहे. यातून या भागात वाहतूक कोंडीची भीती आहे. हे लक्षात घेऊन पालिकेचा कोस्टल रोडचा भुयारी मार्ग ते मफतलाल जिमखानादरम्यान जवळपास २८० मीटर लांबीचा रस्ता दोन्ही बाजूंच्या वाहतुकीसाठी १३ मार्गिकांचा केला जाणार आहे.

नवीन प्रोमोनेड उभारण्याचे प्रस्तावित

सध्या या भागात रस्त्याच्या विस्तारीकरणासाठी मर्यादा आहेत. त्यामुळे अस्तित्वातील प्रोमोनेड म्हणजेच चालण्यासाठी किंवा फिरण्यासाठी असलेल्या मोकळ्या भागात या रस्त्याच्या अतिरिक्त मार्गिकांची उभारणी केली जाणार आहे. परिणामी प्रोमोनेडचा भाग अरुंद होणार आहे.

त्यामुळे समुद्रात तब्बल २२९८ चौरस मीटर जागेवर भराव टाकून नवीन प्रोमोनेड उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्याच्या पर्यावरण मंजुरीची शिफारस करणारा प्रस्ताव एमसीझेडएमएने केंद्र सरकारकडे पाठविला आहे. याला मंजुरी मिळताच समुद्रात भराव टाकून नवीन प्रोमोनेड उभारण्याचे काम सुरू होईल.

तब्बल १३ मार्गिकेच्या रस्त्याची गरज का?

ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह हा भुयारी मार्ग मरिन ड्राइव्ह येथील सरदार वल्लभभाई पटेल रस्त्यावरील जवाहर बालभवनजवळ संपणार आहे. या ठिकाणी वाहनांच्या येण्या-जाण्यासाठी रॅम्प उभारले जातील. सद्यःस्थितीत गिरगाव येथून येऊन मरिन ड्राइव्हकडे जाणाऱ्या रस्त्यावर जवाहर बाल भवन येथे दोन्ही दिशांच्या वाहतुकीसाठी प्रत्येकी चार लेन आहेत. मात्र, ऑरेंजगेट मार्गाच्या रॅम्पमुळे रस्ता निमुळता होईल. त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण करणे गरजेचे आहे. ही बाब हेरून अतिरिक्त पाच मार्गिका उभारून या भागातील रस्ता १३ मार्गिकांचा केला जाणार आहे. यातील मरिन ड्राइव्हवर नरिमन पॉइंटच्या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीसाठी तीन मार्गिका उभारल्या जातील; तर ऑरेंज गेट येथून येणाऱ्या बोगद्यातून बाहेर पडून नरिमन पॉइंटकडे जाणाऱ्या वाहनांसाठी आणखी तीन मार्गिका असतील.

# 'जय महाराष्ट्र' 'व दिलखुलास' कार्यक्रमात महाबीजचे एमडी दिलीप स्वामी यांची मुलाखत

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई:** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमात 'महाबीजच्या कार्याचा आणि आगामी कृषी धोरणांचा वेध' या विषयावर महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) चे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, ३० जून २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित करण्यात येणार आहे. आणि महासंचालनालयाच्या अधिकृत समाज माध्यमावर प्रसारित करण्यात येणार आहे. तसेच 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत गुरूवार २, शुक्रवार, ३ आणि शनिवार, ४ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन आणि 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ?पवर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले आहे. महाराष्ट्राच्या कृषी विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या महाबीजच्या कार्याचा, उपलब्धींचा आणि भविष्यातील कृषी धोरणांचा सविस्तर आढावा या मुलाखतीत घेण्यात येणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार, विश्वासार्ह आणि उच्च उत्पादकता देणाऱ्या बियाण्यांचा पुरवठा करण्यासाठी महाबीज गेली अनेक दशके कार्यरत आहे. या पार्श्वभूमीवर महाबीजची स्थापना, संस्थेचा विकास प्रवास, बियाणे उत्पादन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, साठवणूक आणि वितरण व्यवस्था याबाबत स्वामी सविस्तर माहिती देणार आहेत.

खरीप हंगाम २०२६ साठी करण्यात आलेले नियोजन, अॅग्री-स्टॅक प्रणालीद्वारे बियाणे पुरवठा, 'साथी' (ऍंऊघ) पोर्टलमुळे वाढलेली पारदर्शकता, तसेच शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांवरही या मुलाखतीत चर्चा होणार आहे. याशिवाय बियाण्यांव्यतिरिक्त महाबीजकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध कृषी सेवा, उत्पादने आणि शेतकरी हिताच्या उपक्रमांची माहितीही प्रेक्षकांना मिळणार आहे. संशोधन आणि विकास क्षेत्रातील महाबीजचे योगदान, हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विकसित करण्यात येणारे सुधारित वाण, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील सहभाग, तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), महिला बचत गट आणि युवा उद्योजकांना कृषी मूल्यसाखळीत सहभागी करून घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबतही स्वामी यांनी 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमातून माहिती दिली आहे.

# रोशनचा पुरावा मिटवण्याचा प्रयत्न, पोलिसांना तीन कामगारांची मदत

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** अंधेरी ते बोरिवली रेल्वे स्थानकांदरम्यान झालेल्या घटनेनंतर आरोपी रोशन सुवर्णाने पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. गुन्ह्याची कबुली दिल्यानंतरही शस्त्र कुठे आहे हे सांगण्यास त्याने नकार दिला. पण लोकलमधील व्हायरल व्हिडिओमुळे पोलिसांना पुरावा मिळाला आहे. चर्चगेट-नालासोपारा लोकलमध्ये प्रवासी मयंक लोहारची चाकूने हत्या केल्याप्रकरणी तपास करणाऱ्या रेल्वे पोलिसांच्या हाती घटनेतील चाकू लागला आहे. विशेष म्हणजे, आरोपी रोशन सुवर्णाचा रक्ताने माखलेल्या चाकूसह असलेला व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यामुळेच हा महत्त्वाचा पुरावा पोलिसांपर्यंत पोहोचला. आरोपीची पोलिस कोठडी संपत असून त्याला आज, मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, हत्या केल्यानंतर आरोपी रोशन बोरिवली स्थानकाबाहेर पडला. स्थानकाच्या पश्चिमेकडील पोलिस ठाण्याजवळील एका गल्लीत त्याने हत्येसाठी वापरलेला चाकू रस्त्यावर फेकून दिला आणि तेथून पसार झाला. त्या दिवशी मुसळधार पाऊस झाल्याने चाकूवरील रक्ताचे डाग काही प्रमाणात धुऊन गेले होते. दरम्यान, बोरिवली पूर्व परिसरातून खरेदी करून परतणाऱ्या हॉटेलमधील तीन कामगारांना हा चाकू रस्त्यावर पडलेला दिसला. त्यांनी तो उचलला आणि घरी नेला. धावत्या लोकलमध्ये २३ जूनला झालेल्या हत्येचा व्हिडीओ विविध समाज माध्यमात व्हायरल होत आहे. यात आरोपी रोशनने खुनासाठी वापरलेला चाकू स्पष्ट दिसत आहे. व्हिडीओतील चाकू आणि आपल्याकडे असलेला चाकू एकच असल्याचा संशय कामगारांना आला. कामगारांनी तत्काळ ही माहिती हॉटेल व्यवस्थापकाला दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत व्यवस्थापकाने संबंधित चाकू कामगारांकडून ताब्यात घेत रेल्वे पोलिस ठाण्यात जमा केला. त्यानंतर पोलिसांनी तो ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी जप्त केला आहे.

**रोशनचा स्वभाव आधीपासूनच रागीट**

रोशन पहिल्यापासूनच रागीट स्वभावाचा होता. छोट्या-छोट्या गोष्टींवरून वॉचमन आणि रिक्षा चालकांशी त्याचं अनेकदा भांडण झालं आहे. मयंकच्या हत्येसाठी वापरलेला चाकू रोशनने नुकताच खरेदी केला होता हे पोलिसांच्या तपासात स्पष्ट झाले होते. पनवेलवरून मंगळुर येथे पळून जाण्याचा प्रयत्न करताना पोलिसांनी रोशनला अटक केली. त्यानंतर त्याला बोरिवली दंडाधिकारी न्यायालयात हजर केलं. टाकून दिलेला चाकू परत मिळवण्यासाठी वेळ हवा असल्यामुळे त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्याची मागणी करण्यात आली होती. पण, रोशनला केवळ पाच दिवसांची कोठडी सुनावण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र - ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135